पुणे शहर पोलीस

# दर्पण

ऑक्टोबर २०१९

## Appreciation Letter...

Dear Dr. Venkatesam,

Good Morning

Day before yesterday, I had to take my Mother in Law, aged 97+ and barely able to walk, to a doctor on Siddharth road off Max Mueller Bhavan road.

There was no parking on the side near the doctor. So I asked the traffic cop to allow me to park, which he willingly did. After taking her into the clinic I parked my car in the correct location.

After the doctors appointment was over, I brought my car to the earlier location. A traffic police constable's came there and graciously and politely helped to get her settled in. The police constable's name was 'Nana' and he joined the police after a stint in the army. He was later talking to his superior on the walky-talky and I talked to her to commend Nana for being what a policeman should be.

It is good to meet a policeman who cares. May there be many more "Nanas".

Thank you
Sincerely

# पोलिसांमधील माणूस

पोलिसांमधील माणूस

लोकमत – दि. ३१ ऑक्टोबर, २०१९

# पोलिसांनी साजरी केली गरिबाच्या घरी दिवाळी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोंढवा : कोंढवा वाहतूक पोलीस स्टेशनच्या बाजूला अनेक वर्षांपासून झोपडीत राहत असलेल्या गरिबाच्या घरी वाहतूक शाखेने दिवाळी साजरी केली. या वेळी कोंढवा वाहतूक शाखेच्या वतीने राजू भाटी यांच्या रस्त्याच्या कडेला असलेल्या झोपडीवजा घरासमोर रांगोळी काढून आकाशकंदील लावून दिवाळी साजरी केली गेली. यामुळे गरिबाच्या कुटुंबात समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते. राजू भाटी (वय ३९, रा. टिळकनगर) हा सुमारे ६ वर्षांपूर्वी उदारनिर्वाहाच्या शोधात पुण्यात काळेवाडी येथे आला होता. त्याठिकाणी चार वर्षे राहिल्यानंतर गेल्या तीन वर्षांपासून कोंढव्यातील शिवाजी मैदानाच्या बाहेर झोपड्यामध्ये पत्नी व मुलांसोबत राहतो. त्याची परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने झोपड्याचे समोरच खेळणी विकून व आजबाजची छोटी कामे



करून त्यावर उदरनिर्वाह करतो.

रस्त्याच्या कडेला असलेल्या राजुच्या झोपडीवर आकाशकंदील लावला. झोपडीसमोरील अंगणात सुंदर रांगोळी वाहतूकशाखेच्या पोलिसांनी काढली तसेच पणत्या लावल्या. मागील वर्षांपासून कोंढवा वाहतूक पोलीस दर वर्षी राजूच्या कुटुंबासोबत दिवाळी साजरी करीत आहेत.

- सर्वत्र दिवाळी उत्साहात साजरी होत असताना या कुटुंबाच्या दारात मात्र दिवाळीची पणती नव्हती किंवा आकाशकंदील नव्हता ही बाब कोंढवा वाहतूक कर्मचाऱ्यांनी हेरली व त्या कुटुंबाची दिवाळी साजरी करण्याचे ठरवले. कुटुंबातील सर्वांना नवीन कपडे, दिवाळीचा फराळ, साबण, उटणे, सुगंधी तेल व झोपडीवर लावण्यासाठी आकाशकंदील आणला. राजूच्या लहान मुलासाठी फटाके आणले.

गरीब कुटुंबाची दिवाळी साजरी करु शकल्याचे समाधान पोलिसांनी व्यक्त केले. हा उपक्रम सहाय्यक पोलीस उपायुक्त नवनाथ वाकुडे, कोंढवा वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत निंबाळकर, हवालदार विनोद सावंत, पोलिस नाईक विलास किरवे, संजय जाधव, सुभाष जरांडे, रत्नमाला राणे यांनी राबविला.

# पळालेला मुलगा पालकांकडे सुपूर्द

येरवडा : अक्षर चांगले नाही, म्हणून आईने मारल्याचा राग आल्याने नऊ वर्षांचा मुलगा घरातील दीड हजार रुपये चोरून कोणाला काहीही न सांगता बाहेर पडला. हा मुलगा एका रिक्षात बसून घर सोडून जात होता. रात्र गस्तीवरील असलेल्या विश्रांतवाडी पोलिसांना त्याबद्दल संशय आल्याने त्यांनी रिक्षाचा पाठलाग केला. मुलाला विश्वासात घेऊन विचारणा केली असता, तो घर सोडून जात असल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी या मुलाला सुखरूप घरी सोडले.

विश्रांतवाडी पोलिस ठाण्याचे निरीक्षक (गुन्हे) रवींद्र कदम यांची गुरुवारी रात्री रात्रपाळी होती. झोन चारच्या हद्दीत गस्त घालत असताना चतु:श्रृंगी चौकातून एक रिक्षा वेगात जाताना दिसली आणि रिक्षातून एक मुलगा बाहेर डोकावून पाहत असल्याचे कदम यांना आढळले. संशय आल्याने त्यांनी पाठलाग करून रिक्षाला थांबविले. रिक्षात नऊ वर्षांचा मुलगा होता. कदम यांनी त्याला विश्वासात घेतल्यावर मुलाने माहिती सांगण्यास सुरुवात केली. 'औंध येथील प्रियदर्शनी पार्क परिसरात राहण्यास असून, चौथीत शिकत आहे. अक्षर चांगले नसल्याने आईने मारहाण केली. त्याचा राग आल्याने घरातील दीड हजार रुपये चोरून घर सोडून निघालो आहे,' असे त्याने सांगितले. पोलिसांनी या मुलाला त्याच्या घरी पालकांकडे सुपूर्द केले.

# Cops bring back minor who ran off from home

**Police spot the 10-yr-old aboard an auto during their midnight patrolling; upset for being chastised by mother over studies, he had decided to run away from home**

Gunwanti.Paraste
@timesgroup.com
TWEETS @gunwantimirror

During his routine midnight patrolling on Thursday, police inspector Ravindra Kadam from Vishrantwadi police station noticed something unusual that raised his suspicion. Kadam had spotted a minor aboard an autorickshaw with no company in sight in the dead of night. When the officer and other fellow cops stopped the vehicle to question the child, the boy seemed reluctant to divulge details of what brought him there or to part with his whereabouts. It was only after they remained persistent that the minor finally gave away the details of his midnight escapade. The 10-year-old told the cops that upset for being reprimanded over studies, he decided to run away from his home when other family members went off to sleep. Thanks to the alert cops, the child has been safely handed over to his mother after due counselling.

According to police, on Thursday night, the minor's mother had chastised him for his poor academic show and asked him to improve his performance. The child, however, took the scolding to his heart and decided to flee from his home. Around midnight when everyone else was fast asleep, the minor sneaked out through the main door of the house. Once outside, the child hired an autorickshaw to go to Shivajinagar bus stand. He had planned to take a bus from the depot to go to his grandparents' place. Police patrolling the streets spotted the boy near Bremen Chowk in Aundh in an auto and gestured to the driver to stop. When the driver did not halt, the cops followed the vehicle and stopped it. The cops asked the boy where he was heading to. To this the minor initially hesitated to give out the details and said he was going to his grandparents' place for Diwali. Later, however, he gave in and informed the cops that he was running away from home for being chastised over studies by his mother. The police then obtained details such as his age and house address after probing him further. They also reprimanded the auto driver for agreeing to ferry a child who was not accompanied by a guardian. The cops asked the child to get off the auto and told the driver to report such cases to a police station as such negligence could lead to children going missing.



The minor after being reunited with his mother by Vishrantwadi police

The cops then took both the driver and the minor to Chatushringi police station. There, cops wanted to search his bag and check his mobile phone to get his parent's details. Scared and unsure, the minor was hesitant to let them check his bag and phone. But the cops took him into confidence and counselled him, warning him of the consequences of his actions.

Kadam, along with police constable Vaman Sawant and API Dattatray Shinde, then took the 10-year-old to the address provided by him and landed at his house. When the police reached there, it was around 3 am and the main gate was already open. When the child's mother got up and came out, the cops realised that she was unaware that her son had sneaked out earlier in the night. The cops reassured her, saying that they had come to drop the child back to the safety of his home.

Talking about the incident, Kadam told *Mirror*, "Around midnight on October 25, we saw the child travelling in an auto all alone. We got suspicious and stopped the vehicle. When questioned, the child fumbled and was unwilling to cooperate. We had to calm him down and take him into confidence to get all the details. He even said that he had stolen Rs 1,500 from his mother's purse and had a knife with him for his safety. We counselled the child and dropped him home. We also counselled the mother to be more patient with the child."

# स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी ती आली पुण्यात

## पोलिसांमुळे पालकांकडे पोहोचली सुखरूप परत

**पुणे** : वय वर्षे १६. मुंबईतील जेरीमेरी भागात आपल्या आई-वडीलासोबत राहणारी मध्यमवर्गीय घरातली ती. मात्र घरातले मोबाइल देत नाही, वा कसलेच स्वातंत्र्य देत नाहीत, या कारणावरून ती घरातून पळाली. सोशल मीडियाद्वारे ओळख झालेल्या औरंगाबादेतील मित्रांना भेटण्यासाठी म्हणून खासगी बसने निघालेली ती भेदलेल्या अवस्थेत पोहाचली पुण्याला. शिवाजीनगर भागात आलेली ती सुदैवाने महिला पोलिसांच्या दृष्टीस पडली आणि पोलिसांमुळे ती सुखरूप तिच्या कुटुंबियांना परत मिळाली.

मुंबईतील एका शाळेत शिकणारी ही तरुणी दहावीला एका विषयात अनुत्तीर्ण झाली. त्यामुळे ती घरीच असते, तर तिचे आई-वडिल कामे करतात. आई-वडिल तिला मोबाईल देत नसत. तसेच, तिच्यावर काही बंधनेही घातली होती. पण, तिला स्वातंत्र्य हवे होते. अशातच तिची सोशल मीडियाच्या माध्यमातून औरंगाबाद येथील काही जणांशी मैत्री झाली. रविवारीही आईसोबत तिचा मोबाईल न दिल्यावरून वाद झाला. आणि तिने औरंगाबाद येथील मित्र-मैत्रिणींना मला फ्रीडम हवे आहे. त्यामुळे मी घरातून बाहेर पडली असून मी पुण्यात येत आहे, मला भेटण्यास यावे, असे सांगितले. त्यानुसार, ती सोमवारी सकाळी साडे सात वाजताच रागाच्या भरात तिने घर सोडले. खासगी बसमधून पुण्यात आली.

शिवाजीनगर परिसरात ती मित्र-मैत्रिणींची वाट पाहत होती. पण, त्याचवेळी शिवाजीनगर पोलीस चौकीमधील महिला कर्मचारी सारिका कुंभार यांना एकटीच मुलगी बसल्याचे दिसून आले. तिच्या हालचालींवरून तिच्यावर संशय आला. यामुळे त्यांनी मुलीजवळ जाऊन विचारपूस केली. पण, प्रथम ती काहीच बोलत नव्हती. यानंतर तिला विश्वासात घेऊन विचारपूस केल्यानंतर तिने घरातून पळून आले असून, याठिकाणी मला मित्र भेटण्यास येणार आहेत. त्यांची वाट पाहत असल्याचे सांगितले. त्यानंतर वरिष्ठ निरीक्षक मुरलीधर करपे यांच्या सूचनेनुसार तिच्या पालकांना संपर्क साधण्यात आला. तसेच, त्यांना मुलगी मिळाल्याचे सांगितले. मुलीचे आई-वडिल व मामा, शिवाजीनगर पोलिस ठाण्यात आले. खात्री केल्यानंतर मुलीला पालकांच्या ताब्यात देण्यात आले. पोलिसांनी केलेल्या या कामगिरीबद्दल मुलीच्या कुटूंबियांनी पोलिसांचे आभार मानले.

पुढारी – दि. २४ ऑक्टोबर, २०१९

# दाम्पत्याने एकत्र जीवन संपवायचे ठरविले...
# ...पण नियतीला त्यांचा निर्णय नव्हता मान्य!

**पुणे : प्रतिनिधी**

दोन मुली. त्यांना उच्च शिक्षण दिलं अन् त्यांचा विवाहही थाटामाटात करून दिला. त्या दोघीही त्यांच्या सुखी संसारात आनंदी आहेत. आता आपली सर्व कर्तव्य पार पडली आहेत. पुढे जगण्यात काय अर्थ, आजारी पडून मरण्यापेक्षा आपणच जीवनगाथा संपवू, असे ठरवून एका दाम्पत्याने एकमेकांच्या सहमतीने आत्महत्या करण्याचे ठरविले. मात्र, नियतीला हे मान्य नव्हते. या दोघांनीही आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यात ज्येष्ठाचा मृत्यू झाला, तर महिलेचा जीव मात्र पोलिसांच्या तत्परतेने वाचला.

- ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू
- महिलेला पोलिसांमुळे जीवदान
- बिबवेवाडीतील प्रकार



प्रथम पत्नीने हाताची नस कापली व गळफास घेतला. पतीने ती मृत झाल्याचे समजून तिला खाली घेतले. स्वत: आत्महत्या करण्यापूर्वी पुतण्याला मी आत्महत्या करीत आहे, असा एसएमएस पाठविला, अन गळफास घेतला. त्यादरम्यान, पुतण्याने पुणे पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला माहिती दिली. पोलिस काही क्षणातच येथे दाखल झाले. ज्येष्ठाने गळफास घेतला होता, तर महिला खाली पडलेली होती. पोलिसांनी त्यांना तत्काळ रुग्णालयात दाखल केले. पण, ज्येष्ठ नागरिकाचा तोपर्यंत मृत्यू झाला होता. तर, ज्येष्ठ महिला जखमी अवस्थेत होती. बिबवेवाडी परिसरात ही मन हेलावणारी घटना मंगळवारी उघडकीस आली. बिबवेवाडी पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

बिबवेवाडी परिसरातील सुखसागर भागात हे दाम्पत्य राहते. ज्येष्ठ नागरिक महावितरणमधून निवृत्त झाले आहेत. त्यांना दोन मुली आहेत. दोघीही उच्चशिक्षित आहेत. एक डॉक्टर आहे. ती परदेशात असते. दोघींचेही विवाह झाले आहेत. दोघीही त्यांच्या संसारात सुखी आहेत. आपण आजारी पडून मरण्यापेक्षा स्वेच्छामरण स्वीकारू असा विचार त्यांनी केला. त्याबाबत त्यांनी याबाबत अनेक चिठ्ठ्याही लिहून ठेवल्या आहेत. मंगळवारी त्यांनी जीवनगाथा संपविण्याचा निश्चय केला आणि घरातच गळफास घेण्याचे ठरविले. प्रथम पत्नीने नस कापून घेतली आणि राहत्या घरात गळफास घेतला.

पुतण्याने केलेल्या मेसेजनंतर बिबवेवाडी पोलिस ठाण्यातील कर्मचारी एस. आर. यादव व शशिकांत भोसले यांनी घटनास्थळी धाव घेतली. महिला खाली पडल्याचे दिसून आले. पाहणी केली असता त्या जीवंत असल्याचे लक्षात आले. तर, नागरिकाने गळफास घेतल्याचे दिसून आले. त्यांनी दोघांनाही रुग्णालयात दाखल केले. परंतु, उपचारापूर्वीच ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाला होता. तर, महिला गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांनी नातेवाइकांना ही बाब सांगितली. त्या वेळी त्यांच्या मुली व नातेवाइकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांना पूर्ण घटना सांगितली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतल्याने महिलेला वेळीच उपचार मिळाले. त्यामुळे महिलेचे प्राण वाचविण्यात पोलिसांना यश आले. मात्र, या घटनेमुळे परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

पुढारी – दि. ३१ ऑक्टोबर, २०१९

# रिक्षात विसरलेले दागिने मिळाले परत

## पोलिसांनी सीसीटीव्हीवरून काढला माग

**पुणे : प्रतिनिधी**

ऐन दिवाळीत एका महिलेचे रिक्षात विसरलेले तीन लाखांचे दागिने बंडगार्डन पोलिसांनी सीसीटीव्हीवरून रिक्षाचालकाचा माग काढत परत मिळवून दिले. ही घटना सोमवारी दुपारी घडली. मुख्य म्हणजे रिक्षाचालकानेही बॅग मागच्या डिक्कीत सुरक्षित ठेवून पोलिसांच्या हवाली केली.

जागृती रवींद्र येलदी या मार्केट यार्ड येथे जाण्यासाठी पुणे स्टेशन येथे रिक्षात बसल्या होत्या. त्या राहत्या घरासमोर उतरल्यानंतर त्यांना बॅग रिक्षात विसरल्याचे लक्षात आले. तोपर्यंत रिक्षाचालक निघून गेला होता. यानंतर त्या पतीसह बंडगार्डन पोलिस ठाण्यात आल्या. त्यांनी घटनेची माहिती सहायक पोलिस निरीक्षक संदीप जमदाडे यांना दिली. बॅगमध्ये तीन लाखांचे दागिने आणि महत्त्वाची कागदपत्रे होती. जमदाडे यांनी तातडीने पोलिस कर्मचाऱ्यांच्या मदतीने मालधक्का चौकातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. यानंतर रिक्षाच्या नंबरवरून रिक्षाचालकाची माहिती काढली. त्याचा मोबाईल नंबर मिळवून त्याच्याशी संपर्क केला असता त्याने बॅग रिक्षातच मागच्या बाजूला असल्याचे सांगितले.

त्याला बंडगार्डन पोलिस ठाण्यात बॅग जमा करण्यास सांगण्यात आले. त्याने बॅग जमा केल्यानंतर खातरजमा करून दागिने व कागदपत्रांसह असलेली ही बॅग येलदी यांच्या ताब्यात देण्यात आली. ही कामगिरी पोलिस निरीक्षक दिगंबर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक संदीप जमदाडे, पोलिस हवालदार हरीश मोरे, पोलिस नाईक अय्याज दड्डीकर व पोलिस शिपाई किरण तळेकर यांनी केली.

पुण्यनगरी – दि. १६ ऑक्टोबर, २०१९

# ‘दामिनी’ने अल्पवयीन मुलीला दिले आई-वडिलांच्या ताब्यात

**▮ पुणे : प्रतिनिधी**

स्वारगेट बसथांब्यासमोर शिवाजीनगरकडे जाणाऱ्या बसथांब्यावर रडत असलेली अल्पवयीन मुलगी दिसली. ही बाब स्वारगेट पोलीस स्टेशनमधील दामिनी पथकाच्या लक्षात आली. त्यांनी तिची चौकशी केली असता ती अल्पवयीन मुलगी (घारेगाव, ता. कराड, जि. सातारा) येथून पुण्यात आल्याचे सांगितले. त्यावेळी तिने मित्राबरोबर बोलत असल्याचे आई-वडिलांना आवडत नव्हते.

फोनवर बोलत असल्यामुळे आई-वडील ओरडले. त्यामुळे परीक्षा झाल्यानंतर आम्ही पुण्याला निघून आल्याचे पोलिसांना सांगितले.

स्वारगेट पोलीस स्टेशनमधील दामिनी पथकातील स्वाती रणशिंग आणि जयश्री भालेराव या स्वारगेट येथील गस्तीवर असताना दोघेजण रडत असताना दिसले. त्यांची चौकशी केली असता त्यांनी एकमेकांवर प्रेम आहे. मात्र, ही बाब आई-वडिलांना पसंत नाही. त्यामुळे मी पुण्याला निघून आले आणि मित्राला मुंबईवरून पुण्याला बोलावून घेतले. दरम्यान, तिची अधिक चौकशी केली असता तिने सांगितले की, मित्राबरोबर बोलले नाही, तर करमत नाही. ही बाब आई-वडिलांना पसंत नाही. तिच्याकडून आई-वडिलांचा फोन नंबर घेऊन त्यांच्याशी संपर्क साधला.

त्यावेळी त्यांनी सांगितले की, आम्ही आता तिला रागवणार नाही, तिला समजून घेऊ, असे सांगितले. तिचे आई-वडील स्वारगेट एस. टी. स्थानकावर सोमवारी रात्री साडेअकराच्या सुमारास आले. त्यांची भेट झाल्यानंतर मुलीला त्यांच्या ताब्यात दिले. अल्पवयीन असून, तुला चांगले शिक्षण घेतले पाहिजे. लग्नाचे वय झाल्यानंतर तू तुझ्या मनाप्रमाणे लग्न करू शकते, असे समजावून सांगितले.

# ब्रेन ट्यूमर शस्त्रक्रियेसाठी पोलिसांचा मदतीचा हात

## मुलीच्या कुटुंबीयांकडे २६ हजारांची रक्कम सुपूर्द | भारती विद्यापीठ पोलिसांचे सहकार्य

। पुणे : प्रतिनिधी

कोणी संकटात सापडले तर शंभरला कॉल... गुंड त्रास देत असेल तर शंभरला कॉल... दिवसरात्र नागरिकांच्या सेवेसाठी पोलीस तत्पर असतात. कायदा आणि सुव्यवस्था कायम ठेवण्याचे कर्तव्य पार पाडत असतानाच दत्तनगर परिसरात एक ब्रेन ट्यूमरने ग्रस्त असलेल्या मुलीच्या शस्त्रक्रियेसाठी भारती विद्यापीठ पोलीस कर्मचाऱ्यांनी २६ हजार रुपयांचा निधी जमा करून कुटुंबीयांना देत मदतीचा हात दिला.

'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या ध्येयानुसार समाजातील दुर्जन आणि गुंड प्रवृत्तींचा बीमोड करणे, तसेच सज्जन नागरिकांना रक्षण करण्याचे काम पोलीस करीत असतात. तसेच अहोरात्र संकटात सापडलेल्या नागरिकांच्या मदतीला धावूनही जातात. काही दिवसांपूर्वी दत्तनगर परिसरात राहणाऱ्या लक्ष्मी लादे (वय ६२, रा. दत्तनगर) या भारती विद्यापीठ पोलीस ठाणे अंकित दत्तनगर पोलीस चौकी येथे आल्या. त्यांनी चौकी अंमलदार म्हणून कार्यरत असलेले सहायक फौजदार अनिल शिंदे यांची भेट घेतली. बारावी उत्तीर्ण मुलगी उमा (वय १९) हिला ब्रेन ट्युमर झाला असून, तिच्यावर एरंडवणे येथील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया होणार आहे. त्यासाठी अडीच लाख रुपयांचा खर्च येणार आहे, अशी माहिती दिली, तसेच कुटुंबाची परिस्थिती बिकट असून, आम्हाला हा खर्च न झेपणारा आहे असे सांगितले. आणि आपण आम्हाला मदत करावी, असे त्यांना आवाहन केले.



दत्तनगर चौकीतील सर्व पोलिसांनी उमा हिच्या शस्त्रक्रियेसाठी मदत करण्याचे ठरविले. सहायक फौजदार शिंदे, पोलीस शिपाई नेताजी कांतागळे, संदीप मांडगे, अजित कोकरे यांनी स्वतः तसेच ओळखीच्या लोकांकडून मदत निधी जमा केला. तसेच जमविलेले २६ हजार १२० रुपयांची रक्कम भाऊबीजेच्या दिवशी लक्ष्मी लादे यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांकडे सुपूर्द केली. आवाहनाला प्रतिसाद देत मदत केल्यामुळे लादे यांनी भारती विद्यापीठ पोलिसांचे आभार मानले. पोलिसांनी ब्रेन ट्यूमर असलेल्या मुलीच्या शस्त्रक्रियेसाठी २६ हजार रुपयांचा निधी मिळवून देत माणुसकीचे दर्शन घडविले.

### आणखी शस्त्रक्रियेची गरज

उमा ही बारावी उत्तीर्ण आहे. तिची आई धुणीभांडीचे काम करते, तर वडील हे रिक्षाचालक आहेत. दोन महिन्यांपूर्वी उमावर मंगेशकर हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया झाली होती. मात्र, मेंदूतील गाठ वाढल्याने पुन्हा तिच्यावर आणखी एक शस्त्रक्रिया करावी लागणार आहे, अशी माहिती दत्तनगर चौकीतील पोलिसांनी दिली.

सकाळ – दि. ३१ ऑक्टोबर, २०१९

# दागिन्यांची बॅग पोलिसांमुळे मिळाली परत

**पुणे, ता. ३० :** रिक्षातून घरी पोचल्यानंतर घाईगडबडीमध्ये उतरताना एका महिलेची तब्बल तीन लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व महत्त्वाची कागदपत्रे असलेली बॅग रिक्षामध्ये राहिली. या घटनेनंतर महिलेने पतीसह बंडगार्डन पोलिस ठाण्यात धाव घेतली. त्यानंतर बंडगार्डन पोलिसांनी सीसीटीव्ही चित्रीकरण व तांत्रिक विश्लेषणाद्वारे काही वेळातच रिक्षाचालकाचा शोध घेतला आणि महिलेची बॅग तिला परत मिळवून दिली.

मार्केट यार्डजवळील सॅलिसबरी पार्क येथे राहणाऱ्या जागृती रवींद्र येलदी (वय २६) या सोमवारी सकाळी अकरा वाजता पुणे स्टेशन येथून रिक्षाने त्यांच्या घरी गेल्या. त्या वेळी आपली बॅग रिक्षामध्येच विसरल्याचे त्यांच्या लक्षात आले. तोपर्यंत रिक्षा निघून गेली होती. त्यांनी ही बाब तत्काळ त्यांचे पती रवींद्र यांना सांगितली. दोघांनीही तातडीने बंडगार्डन पोलिसांकडे धाव घेतली.

दरम्यान, सहायक पोलिस निरीक्षक संदीप जमदाडे यांनी पोलिस निरीक्षक दिगंबर शिंदे (गुन्हे) यांना याबाबतची माहिती दिली. त्यानंतर शिंदे यांनी तत्काळ पोलिस कर्मचारी हरीश मोरे, अय्याज दड्डीकर, किरण तळेकर यांना गतीने तपास करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार, पोलिसांनी मालधक्का चौकातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले. त्यामध्ये जागृती यांनी ज्या रिक्षातून प्रवास केला, ती रिक्षा त्यांच्या निदर्शनास आली. त्या रिक्षाच्या क्रमांकावरून रिक्षाचालकाची माहिती पोलिसांनी काढली. त्याच्या मोबाईलवर संपर्क साधून बॅगेबाबत विचारणा केली. त्या वेळी रिक्षाचालकाने संबंधित बॅग रिक्षाच्या डिक्कीमध्ये असल्याचे सांगितले. ही बॅग तत्काळ पोलिस ठाण्यात जमा करण्यास पोलिसांनी सांगितले. त्यानुसार रिक्षाचालकाने बॅग पोलिस ठाण्यामध्ये आणून दिली. त्यानंतर पोलिसांनी येलदी दांपत्यास बोलावून घेऊन बॅग त्यांचीच असल्याची खात्री करून घेतली आणि त्यांना ती परत दिली.

# Appreciation Letter...

To,
Dr. K. Venkatesham
Commissioner of Police, Pune City

Respected Sir

We would like to take an opportunity to express our heartfelt gratitude for the immense help we received from the Bibwewadi Police Personal. World came crashing down on us when we lost our father and our mother was seriously wounded. It was Police Nayak Mr. Bhosle (6481) who noticed that she was still alive and alerted the family who immediately took her to hospital. Our mother is alive today because of the timely help imparted by the Bibwewadi police.

In the time of grief we were helped by ASI Mr. Mahajan and PC Mr. Yadav with the legal formalities in Sasoon Hospital.

We would always be indebted for the assistance provided by the whole team of Bibwewadi Police. A special word of gratitude especially for PSI Mr. Atul Thorat (for his emotional and overall assistance), PN Mr. Devkute (7546) & PC Mr. Lokhande (has been very helpful while recording our statements and apologized to us in case of delays). The whole team was lead by PI Mr. Kumar Ghadge.

Like every law abiding citizen we used to be scared of police and police stations but our experience with the Bibwewadi Police has completely changed our perception.

We (the sister duo) apart from indebted will always be available and more than happy to be of any help to the Pune Police.

Unfeigned Regards,
Daughters of a doting father

P.S. We would be very happy if this mail would be shared over the social media and other forums but request you not to reveal our identity.



150 women rescued fr[om] sex rackets since Janu[ary]

पोलिसांनी साजरी केली गरिबाच्या घरी दिवाळी

3 held for possession of pangolin; third [c]ase in 10 months

खवल्या मांजराच्या विक्रीसा[ठी] आलेल्या तिघांना अटक

दीड कोटींची ब्राउन शुगर जप्त

बुधवार पेठेतील वेश्याव्यवसायावर छापा

कोकेन विक्री करणारा नायजेरियन अटकेत

बेकायदा पिस्तूल बाळगणारा अटकेत

बोनस देण्याच्या बहाण्याने फसवणूक करणाऱ्याला अटक

अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या दाम्पत्याला अटक

Cops bring back minor who ran off from home

पोलिसांच्या योग्य नियोजनामुळे मतदान शांततेत

पळालेला मुलगा पालकांकडे सुपूर्द

हरवलेल्यांच्या शोधासाठी पोलिसांचा मिसिंग सेल

गुन्हे शाखेच्या विशेष पथकाकडून २२ फरारी आरोपींना अटक

दाम्पत्याने एकत्र जीवन संपवायचे ठरविले... ...पण नियतीला त्यांचा निर्णय नव्हता मान्य

मध्यवस्तीमधील लॉटरी जुगार

स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी ती आली पुण्यात

लग्नाच्या आमिषाने फसवणारा झाला गजाआड

फसविणारे दोन नायजेरियन जाळ्यात

रिक्षात विसरलेले दागिने मिळाले परत

पोलिसांनी सीसीटीव्हीवरून काढला माग

Crime Branch Unit III nabs duo with drugs worth ₹77L

संघटनांतर्फे महिला पोलिसांचा सन्मान

खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यातील फरारी पोलिसांच्या जाळ्यात

पोलिस आयुक्तांची [गु]न्हेगारी 'सफाई' मोहीम सुरू

'दामिनी'ने अल्पवयीन मुलीला दिले आई-वडिलांच्या ताब्यात

विधिसंघर्षित मुलां[नी] साजरी केली दिवा[ळी]

[भ]ांडण करून पळालेला मुलगा सुखरूप परत

मोबाईल वेडापायी मुलीने सोडले घर

खून करणाऱ्या म्होरक्यासह पाच जणांना अटक

[फ]सवणूक करणाऱ्याला दिल्लीतून अटक